महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : १६ ■ सप्टेंबर २०२४ ■ पाने : ८

# महावितरणसाठी अभिमानाचा क्षण, सर्वांचे अभिनंदन!

## हितगुज



**श्री. लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**मा. मुख्यमंत्री** श्री. एकनाथ शिंदे आणि मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दि. १८ ऑगस्ट २०२४ रोजी सातारा येथे मान्याचीवाडी गावचे सरपंच रविंद्र माने यांना महावितरणतर्फे सौरग्राम मानचिन्ह प्रदान केले, हा क्षण महावितरणसाठी अभिमानाचा होता. सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी या प्रगतीशील गावाने आपली विजेची संपूर्ण गरज गावातच सौर ऊर्जेद्वारे भागविण्यासाठी यशस्वी पाऊल टाकले आहे, त्याबद्दल मा. मुख्यमंत्र्यांनी व मा. उपमुख्यमंत्र्यांनी त्या गावाचा गौरव केला.

मान्याचीवाडी गावात प्रत्येक घरावर प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेऊन सौर पॅनेल्स बसविले आहेत. त्यामुळे त्या घरांवरच विजेची निर्मिती होत असून ती वीज घरात वापरली जाते. गरजेपेक्षा जास्त वीजनिर्मिती होण्यामुळे बिल शून्य होते. अशा रितीने सर्व गावकऱ्यांना मोफत विजेचा लाभ होत आहे. अतिरिक्त वीज निर्माण झाली तर ती महावितरणला विकून उत्पन्नाची संधीही मिळत आहे. गावाच्या ग्रामपंचायत कार्यालयाची आणि स्थानिक पाणी पुरवठा योजनेची विजेची गरज भागविण्यासाठी सौर पॅनेल्स बसविले आहेत. गावातील रस्त्यावरील दिव्यांचे संपूर्ण सौर ऊर्जीकरण करण्यात आले आहे. आटा चक्कीसाठीही सौर पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती केली जात आहे.

मान्याचीवाडी गावाचे शंभर टक्के सौर ऊर्जीकरण होण्यामध्ये महावितरणच्या स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. राज्यातील पहिल्या यशस्वी सौरग्रामाबद्दल मी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. मान्याचीवाडी सौरग्राम झाल्याची दखल मा. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जामंत्री श्री. प्रल्हाद जोशी यांनी घेतली व त्यांनी गावाचे कौतुक करणारे ट्वीट केले. मी त्यांचे आभार मानतो. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेच्या ट्वीटर हँडलवरूनही मान्याचीवाडीचा गौरव करणारे ट्वीट झाले. एकूणच ही घटना आपणा सर्वांसाठी अभिमानाची ठरली.

### पहिल्या टप्प्यात शंभर गावे

मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात महावितरणने एक महत्त्वाची योजना हाती घेतली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील किमान दोन अशा शंभर गावांना सौर ग्राम करण्याची ही योजना आहे. या योजनेतील मान्याचीवाडी हे पहिले गाव आहे. मान्याचीवाडी गावात जसे प्रत्येक घरात सौर पॅनेल्स बसले तसेच या सर्व गावांमध्येही आपल्याला बसवायचे आहेत. त्यासाठी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना उपयुक्त आहे. या योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून वीज ग्राहकांना सौर पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करण्यासाठी थेट अनुदान मिळते. तीन किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपये एवढे घसघशीत अनुदान मिळते. एक किलोवॅटला तीस हजार आणि दोन किलोवॅटला साठ हजार रुपये अनुदान मिळते. त्यामुळे महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या वीज ग्राहकांना मोफत वीज मिळविण्याची आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळविण्याची संधी मिळाली आहे. आपण सर्वांनी पुढाकार घेऊन वीज ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळवून द्यायला हवा. तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही आपल्या घरी या योजनेतून सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून समाजासमोर उदाहरण घालून दिले पाहिजे.

सौरग्राममधील प्रत्येक घरावर सोलर पॅनेल्स बसतील, त्यावेळी त्यांचे वीजबिल शून्य होईलच व सोबत संपूर्ण गावाचे सौर ऊर्जीकरण करण्यास मोठा हातभार लागेल. यासोबत सौरग्राम योजनेत गावातील ग्राम पंचायत कार्यालय, जिल्हा परिषदेची शाळा, पाणी पुरवठा योजना, रस्त्यावरील दिवेही सौर ऊर्जेवर चालवायचे आहेत. थोडक्यात गावाची विजेची शंभर टक्के गरज सौर ऊर्जेच्या आधारे भागवायची आहे. मान्याचीवाडी हे पहिले यशस्वी पाऊल आहे. अशी शंभर पावले पहिल्या टप्प्यात टाकायची आहेत. मला खात्री आहे की, महावितरणचे अधिकारी व कर्मचारी हे काम यशस्वी करतील.

### सौरऊर्जेचा यशस्वी वापर

सध्या जगभर नवीकरणीय ऊर्जेच्या वापरावर भर दिला जात आहे. या ऊर्जेच्या वापरामुळे पर्यावरण रक्षणाला हातभार लागतो. देशाचे नेट झिरोचे उद्दिष्ट गाठण्यास मदत होते. त्यासोबत ही ऊर्जा वापरणे किफायतशीर असल्याने आर्थिक लाभ होतो. काळाची पावले ओळखून महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगिण आर्थिक विकासासाठी मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सौरऊर्जेच्या यशस्वी वापराला मोठी चालना दिली आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा ९००० मेगावॅट क्षमतेचा जगातील सर्वात मोठा डिस्ट्रिब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प राज्यात सध्या राबविण्यात येत आहे. लवकरच टप्प्याटप्प्याने त्याचा लाभ मिळणे सुरू होईल. महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागासोबत समन्वयाने महावितरणने या योजनेच्या अंमलबजावणीत मोलाची कामगिरी बजावली आहे. मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच या योजनेचा विस्तार करून आणखी ७००० मेगावॅट क्षमता वाढविण्यास मंजुरी दिली. त्यासोबत मागेल त्याला सौर कृषी पंप या राज्य सरकारच्या योजनेत राज्यात दहा लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. उपसा सिंचन योजनांच्या सौर ऊर्जीकरणासाठी सरकार पावले टाकत आहे. आगामी काही वर्षात राज्यातील सिंचनासाठी संपूर्णपणे सौर ऊर्जा वापरण्याचा ऐतिहासिक व क्रांतिकारी टप्पा गाठला जाईल. महावितरण या क्रांतीतील महत्त्वाचा घटक ठरेल ही अभिमानाची बाब असेल. ■

महावितरणची योजना

# १०० टक्के सौर ऊर्जेवर, राज्याच्या सौर नकाशावर!

**प्रत्येक जिल्ह्यातील** किमान दोन गावांना शंभर टक्के सौर ऊर्जेद्वारे वीजपुरवठा करण्याची योजना महावितरणने तयार केली असून निवड झालेल्या गावांना येत्या दोन महिन्यांत सौर ऊर्जेद्वारे शंभर टक्के वीजपुरवठा करण्यात येणार आहे.

निवड झालेल्या गावात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत घरगुती ग्राहकांना ३ किलोवॅटपर्यंत ७८ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार असून पाणीपुरवठा व दिवाबत्ती योजनांच्या सौर ऊर्जीकरणासाठी शासकीय निधीतून पैसे उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच या गावांतील सर्व वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांना या योजनेत सहभागी होण्यासाठी महावितरण आवाहन करणार आहे.


प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत निवासी घरगुती ग्राहकांसाठी प्रति किलोवॅट ३० हजार रुपये अनुदान दोन किलोवॅटपर्यंत मिळते. तीन किलोवॅटपर्यंत अतिरिक्त एक किलोवॅट क्षमतेसाठी रु. १८ हजार अनुदान मिळते.



राज्यातील पहिले सौरग्राम 'मान्याचीवाडी' सन्मान सोहळ्याप्रसंगी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे समवेत सरपंच श्री. रवींद्र माने व मान्यवर

विशेष म्हणजे सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील आदर्श गाव मान्याचीवाडी ह्या गावाला शंभर टक्के सौर ऊर्जेद्वारे वीजपुरवठा करण्यात आलेला असून हे गाव सौरग्राम म्हणून नावलौकिकास आले आहे.

| | | |
|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | – | पाटोदा, दरेगाव |
| बीड | – | नांदाडी, आनंदवाडी, |
| लातूर | – | नवीन आदर्श कॉलनी, मयूरबन सोसायटी |
| हिंगोली | – | सुलदली गोरे, दातेगाव |
| नांदेड | – | हाडोळी, दावणगिर |
| परभणी | – | आंबेटाकळी, खरबा |
| धुळे | – | कळगाव, नांथे |
| जळगाव | – | निंबोल, पातोंडी |
| नंदुरबार | – | मोहिदा, ब्राह्मणपुरी |
| पालघर | – | अक्करपट्टी, कोळगाव शिवनेरी, निर्वाण |
| रत्नागिरी | – | फुरुस, असूर्डे |
| अहमदनगर | – | पारेगाव, हिवरे बाजार |
| नाशिक | – | कोनांबे, दारणा सांगवी वाके, निंबोळा |
| अकोला | – | बाभुळगाव, सौंदळा |
| बुलढाणा | – | बजरंग नगर-सागवान एरिया, सावजी लेआउट-सुताळा खुर्द |
| वाशिम | – | झाकळवाडी, पारवा |




**प्रत्येक जिल्ह्यातील गावांची निवड**

| | | |
|---|---|---|
| अमरावती | – | नवाथे, काठोरा |
| चंद्रपूर | – | सोमनाथ, आनंदवन |
| गडचिरोली | – | कोंढाणा, तुंबडी मेंढा |
| भंडारा | – | भोसा, दहेगाव |
| वर्धा | – | नागझरी, नेरी मिर्झापूर |
| सोलापूर | – | चिंचणी, औज |
| कोल्हापूर | – | शेळकेवाडी, पिराचीवाडी |
| सांगली | – | झुरेवाडी, निमसोड |
| पुणे | – | शिवतीर्थ नगर-कोथरूड, सेक्टर २४ निगडी - भोसरी वंजारवाडी कुंभारकर वस्ती, गणेश रोड नाणगाव |
| रायगड | – | पाडवी पठार, वडवळ |
| | – | नेरेपाडा गाव, शिवणसाई गाव |
| ठाणे | – | शिरवली, कुंभारली |
| | – | गोलभान, मोहोप |
| नागपूर | – | चिखली, सिंधी, किर्मिती, भरकस कॉस्मोपॉलिटन |
| जालना | – | देवळा, आनंदवाडी |

शंभर टक्के सौर ऊर्जीकरणासाठी निवड करण्यात आलेल्या गावांची / ठिकाणांची नावे

# राज्यातील पहिले सौरग्राम 'मान्याचीवाडी'तील सौर ऊर्जीकरणाचे लोकार्पण



▸▸ मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे यांच्याहस्ते राज्यातील पहिले सौरग्राम मान्याचीवाडीचे (ता. पाटण, जि. सातारा) सरपंच श्री. रवींद्र माने यांना मानपत्र देण्यात आले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री ना. श्री. शंभूराज देसाई, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्यासह मान्यवर.

**राज्य शासनाने** गेल्या अडीच वर्षांत सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून वीजक्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना एप्रिलपासून पुढील पाच वर्ष मोफत वीज देण्यात येत आहे. तर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व मागेल त्यांना सौर कृषिपंप योजनेतून दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार आहे. सोबतच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती वीजग्राहकांचे वीजबिल देखील शून्यवत होत आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी व घरगुती वीजग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे यांनी दिली.

पाटण तालुक्यातील (जि. सातारा) मान्याचीवाडी गावामध्ये महावितरणच्या वतीने १०० टक्के सौर ऊर्जीकरण करण्यात आले आहे. राज्यातील पहिले 'सौरग्राम' झालेल्या मान्याचीवाडीतील सौर ऊर्जीकरणाचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे बोलत होते. वीजक्षेत्रात राज्य शासनाने केलेल्या कामगिरीबद्दल उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांचे तसेच पहिल्या सौरग्रामचे सरपंच श्री. रवींद्र माने यांचे त्यांनी जाहीर अभिनंदन केले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री ना. श्री. शंभूराज देसाई, महिला व बालविकास मंत्री ना. आदिती तटकरे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, मान्याचीवाडीचे सरपंच श्री. रवींद्र माने, संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री ना. श्री. शिंदे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी गावाने राज्यात पहिले सौरग्राम होण्याचा मान मिळवला आहे. या गावातील प्रत्येक नागरिकाचे मी अभिनंदन करतो. सौर ऊर्जा ही प्रामुख्याने घरगुती ग्राहक व शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य होत आहे. तसेच राज्य शासनाने मागेल त्याला सौर कृषिपंप योजना जाहीर केली असून खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के रक्कम तर अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांना पाच टक्के रक्कम भरून ७.५ अश्वशक्तीपर्यंत कृषिपंप व सौर पॅनेल्स मिळणार आहे. उर्वरित रक्कम राज्य शासन अनुदानातून देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री ना. श्री. शिंदे यांनी दिली.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध होत आहे. येत्या दीड वर्षांमध्ये राज्यात सौर ऊर्जेद्वारे १२ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी रात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही. राज्याने सौर ऊर्जेमध्ये मोठी आघाडी घेतली आहे. राज्यात पहिले सौर ग्राम म्हणून मान्याचीवाडीतील सौर ऊर्जीकरणाचे लोकार्पण झाले, याचा आनंद आहे. या गावात पूर्वी ५ लाख २५ हजार रुपयांचे वीजबिल येत होते. ते सौर ग्राममुळे शून्य झाले आहे. आता राज्यातील १०० गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरु असून त्यासाठी गावांची निवड झाल्याचे ना. श्री. फडणवीस यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष श्री. नरेंद्र पाटील, आमदार श्री.शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार श्री.महेश शिंदे, आमदार श्री.जयकुमार गोरे, आमदार श्री. जयंत आसगावकर, कार्यकारी संचालक (पायाभूत आराखडा) श्री. धनंजय औंढेकर, पुणे प्रादेशिक संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य अभियंता श्री. अंकुश नाळे, अधीक्षक अभियंता (चाचणी) श्री. अमित कुलकर्णी, अधीक्षक अभियंता श्री. बाळासाहेब हाळनोर(सातारा), कार्यकारी अभियंता सर्वश्री अमित बारटक्के, बाळासाहेब मोहिते, उपकार्यकारी अभियंता श्री. चेतन कुंभार व तळमावले शाखा अभियंता श्री. धनंजय शेंडे यांची उपस्थिती होती. ■

## वाघोलीतील सौर ऊर्जा प्रकल्पांची श्रीमती आभा शुक्ला यांच्याकडून पाहणी



**घरगुती वीजग्राहक** तसेच गृहनिर्माण संस्थांना वीजबिल शून्यवत करण्याची सुवर्णसंधी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून उपलब्ध झाली आहे. त्यामुळे घरगुती वीजग्राहकांनी या अनुदानीत योजनेत सहभागी व्हावे तसेच अधिकारी – कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना जलद सेवा द्यावी व समन्वय साधावा, असे आवाहन ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला यांनी केले.

वाघोली येथील न्याती एलान सोसायटीच्या सामूहिक वीजवापरासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून १० किलोवॅटचा छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पाची श्रीमती आभा शुक्ला व श्री. लोकेश चंद्र यांनी पाहणी केली. सोसायटीच्या अध्यक्ष श्रीमती ममता जोशी, सचिव श्री. निरंजन कारवेकर, सर्वश्री रवींद्र वाळके, गणेश कोलते, पंकज मुटेरी यांच्याशी संवाद साधला. ■

वाघोली



अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी गणेश खिंड व वाघोली शाखा कार्यालयातील जनमित्रांशी ग्राहक तक्रारी व निवारण, विद्युत सुरक्षा साधनांचा वापर इ. बाबत संवाद साधला. ■

गणेशखिंड



**स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा**



**प्रकाशगड** सांघिक कार्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. डॉ. पी. अनबलगन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संचालक (संचालन तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. भूषण कुलकर्णी, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. राकेश जनबंधु, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यातील प्रादेशिक, परिमंडल, मंडल तसेच क्षेत्रीय कार्यालयात स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. ■



## स्वातंत्र्य दिनी छत्रपती संभाजीनगरमध्ये बालोद्यानाचे उद्घाटन

**स्वातंत्र्यदिनी** छत्रपती संभाजीनगर येथील विद्युत भवन कर्मचारी वसाहतीत सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता यांच्या हस्ते बालोद्यानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्य अभियंता श्री. पवनकुमार कछोट, महाव्यवस्थापक (मानव संसाधन–मासंव्यप्र) श्री. राजेंद्र पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बालोद्यान व ग्रीन जिम उभारण्याबाबत महावितरणने महानगरपालिकेस प्रस्ताव दिला. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत आयुक्त श्री. जी. श्रीकांत यांनी सहकार्य केले. वसाहतीतील कर्मचारी व पाल्यांनी या उपक्रमाबाबत आनंद व्यक्त केला. याप्रसंगी ई-वेस्टपासून ई-बायसिकल बनवून त्या गरजूंना वाटणारा विद्यार्थी चि. आयुष चुडीवाल आणि त्याचे आई-वडील श्रीमती अंजली व डॉ.तुषार चुडीवाल यांचा गौरव करण्यात आला. एशियन हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ.शोएब हाश्मी यांच्या वतीने शाखा कार्यालये व उपकेंद्रांना प्रथमोपचार पेट्या देण्यात आल्या. यावेळी प्रभारी महाव्यवस्थापक श्री. नितीन पाडसवान, अधीक्षक अभियंता सर्वश्री शांतीलाल चौधरी, श्रीकांत पाटील, विजय मोरे, प्रभारी उपमहाव्यवस्थापक श्री. चंद्रकांत खाडे, वरिष्ठ व्यवस्थापक श्री.लक्ष्मीकांत राजेळी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. ■



▸▸ विद्युत भवन कर्मचारी वसाहतीत बालोद्यानाचे उद्घाटन प्रसंगी मान्यवर.

# भविष्यवेध घेऊन वीजपुरवठा यंत्रणेचे नियोजन करा

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांचे निर्देश

**'नवीन वीजजोडण्यांसह** विजेची मागणी दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. त्यामुळे भविष्यवेध घेऊन विजेची वाढती मागणी पूर्ण करणाऱ्या वितरण यंत्रणेचे जागेच्या उपलब्धतेसह नियोजन करावे. प्रामुख्याने घरगुती ग्राहक, शेतकरी आणि इतर ग्राहकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या विविध योजनांची प्रभावी व वेगाने अंमलबजावणी करावी. तसेच ग्राहकसेवा व तक्रार निवारणातील तत्परता आणखी वाढविण्यासाठी विभाग किंवा उपविभाग कार्यालयांचे विभाजन आवश्यक असल्यास प्रस्ताव पाठवावेत', असे निर्देश महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी दिले. पुण्यातील प्रकाश भवन येथे अधिकाऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार, अधीक्षक अभियंते सर्वश्री अरविंद बुलबुले, युवराज जरग, सिंहाजीराव गायकवाड यांची उपस्थिती होती.

यावेळी श्री. चंद्र म्हणाले की, घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्यवत करणारी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मागेल त्यांना सौर ऊर्जा कृषिपंप तसेच वीजयंत्रणेच्या बळकटीकरणासाठी सुधारित वितरण क्षेत्र योजना (आरडीएसएस) आदी योजनांद्वारे वीजक्षेत्रामध्ये ग्राहकाभिमुख आमुलाग्र सुधारणा होणार आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व ग्राहकांना लाभ मिळवून देणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य व जबाबदारी आहे. तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत स्वत: सहभागी होऊन शेजारी, नातेवाईक व मित्रमंडळींकडेही आग्रह धरला पाहिजे.



▸▸ पुणे परिमंडलातील अधिकाऱ्यांशी विविध मुद्द्यांवर संवाद साधताना श्री. लोकेश चंद्र.

पुणे परिमंडलात सहा अतिउच्चदाबाचे उपकेंद्र उभारण्याचे प्रस्ताव मंजूर करून महापारेषणकडे पाठविण्यात आले आहेत. चाकण व भोसरी उपविभागांचे विभाजन करून नवीन उपविभाग व शाखा कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. वाढती ग्राहक संख्या व विजेची मागणी पाहता अशा प्रकारच्या प्रस्तावांसाठी व्यवस्थापन सकारात्मक आहे, असे श्री. चंद्र यांनी सांगितले. वीज यंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणासाठी आणखी काही नव्या योजनांचा प्रस्ताव आहे. मात्र पुणे, पिंपरी चिंचवडसारख्या महानगरांमध्ये वीजयंत्रणांसाठी जागेच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे दिसत आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे, अशी सूचना त्यांनी केली. ■

# राज्यातील पहिल्या ग्रीन पॉवर चार्जिंग स्टेशनची पाहणी



▸▸ 'प्रकाश भवन' इमारतीच्या छतावरील ६० किलोवॅट सौर ऊर्जा प्रकल्पाची पाहणी.




▸▸ गणेशखिंड,पुणे येथील राज्यातील पहिल्या हरित ऊर्जेवरील विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनची पाहणी.

**गणेशखिंड,** पुणे येथील 'प्रकाश भवन' प्रशासकीय इमारतीच्या छतावरील ६० किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाची व राज्यातील पहिल्या हरित ऊर्जेवरील विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनची श्री. लोकेश चंद्र यांनी पाहणी केली. या प्रकल्पाद्वारे चार्जिंग स्टेशनसाठी गेल्या दोन महिन्यांत १४ हजार ४०० युनिट विजेची निर्मिती झाली आहे. चार्जिंगसाठी विद्युत वाहनधारकांना केवळ १३ रुपये प्रतियुनिट दर आकारणी केली जात आहे. इतर संस्थांच्या तुलनेत हे दर स्वस्त असल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी दिली. यावर श्री. लोकेश चंद्र यांनी समाधान व्यक्त केले. इतरही विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनसाठी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना वेग देण्याची सूचना केली. ■

## ईशाली पांडे टेक्सटाईल डिझायनिंग पदवी परिक्षेत प्रथम



**भोपाळ** येथील नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) मधून कु. ईशाली पांडे हीने नुकतीच 'टेक्सटाईल डिझायनिंग' या विद्याशाखेत प्रथम क्रमांकाने पदवी प्राप्त केली आहे. पदवीच्या चौथ्या अंतिम वर्षात ९.४५ गुणांकनासह तुकडीत ती प्रथम राहिली आहे. पदवीत तिचे एकूण ८.९ गुणांकन आहे. विशेष म्हणजे तिने उत्तराखंड राज्यातील पिथौरागड जिल्ह्यातील शाश्वत व सामुहिक विकास तत्वावर कार्यरत 'अवनी' या नामांकित संस्थेतून 'नॅचरल डाईंग अॅन्ड हॅन्डलूम' या विषयात प्रकल्प कार्य पूर्ण केला आहे. प्रकाशगड सांघिक कार्यालयात कार्यरत महाव्यवस्थापक (मानव संसाधन-मासंव्यप्र) श्री.राजेंद्र पांडे यांची ती सुकन्या आहे. ■

## सीएमए परीक्षेत ओम पोतलवाडचे यश



**द इन्स्टिट्यूट** ऑफ कॉस्ट अकाउंटंट ऑफ इंडियातर्फे घेण्यात आलेल्या कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट या परीक्षेत फायनल ग्रूपमध्ये ओम नरेश पोतलवाडने ऑल इंडिया रँक १७ व महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश मिळवले आहे. छत्रपती संभाजी नगर ग्रामीण-२ विभागात कार्यरत सहाय्यक लेखापाल श्रीमती अश्विनी पोतलवाड यांचा तो सुपुत्र आहे. ■

## आर्य शाहला 'आयआयटी'ला प्रवेश



**आर्य शाह** याने जेईई अॅडव्हान्स परीक्षेत गुणवत्ता प्राप्त करून आयआयटी, खरगपूर या देशातील नामांकित शैक्षणिक संस्थेत बी.टेक. च्या विद्युत अभियांत्रिकी शाखेत प्रवेश मिळविला आहे. या यशाबद्दल मुख्य अभियंता श्री.ज्ञानेश कुलकर्णी यांनी त्याचे अभिनंदन केले आहे. अमरावती परिमंडल कार्यालयात कार्यरत उपव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री.शिरीष शाह व श्रीमती संध्या शाह यांचा तो सुपुत्र आहे. आर्यने बारावीच्या परीक्षेत ९४.४० टक्के , जेईई परीक्षेत ९९.९० तर एमएच-सीईटीमध्ये ९९.९४ % गुण मिळविले आहेत. ■

## यश काठोटेला 'आयआयटी'ला प्रवेश



**यश काठोटे** याने जेईई अॅडव्हान्स परीक्षेत गुणवत्ता प्राप्त करून आयआयटी,दिल्ली या देशातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेत बी.टेक. च्या स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत प्रवेश मिळविला आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडल अंतर्गत पॉवर हाऊस उपकेंद्रात कार्यरत प्रधान यंत्रचालक श्री.हिरालाल काठोटे यांचा तो सुपुत्र आहे. या यशाबद्दल मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट यांनी त्याचे अभिनंदन केले आहे. ■

## अकोला परिमंडलात सौर जागर



अकोला परिमंडलात पथनाट्याद्वारे
प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची जनजागृती.

## नागपूर, वर्ध्याला औद्योगिक ग्राहकांशी संवाद

**औद्योगिक** ग्राहकांच्या अडचणी व तक्रार निवारणासाठी मंडल स्तरावर स्वागत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. नागपूर आणि वर्धा येथील स्वागत कक्षातर्फे औद्योगिक ग्राहकांसोबत सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागपूर शहर मंडल कार्यालयात मुख्य अभियंता श्री.दिलीप दोडके, सल्लागार (ग्राहक व्यवहार) अॅड. गौरी चंद्रायण, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री.राजेश घाटोळे यांच्यासह विविध औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी आणि ग्राहक प्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत उच्चदाब वीज ग्राहकांचे बिलिंग, नवीन वीज जोडणी, सबसिडी आणि अखंडित वीजपुरवठा इ. विषयांबाबत चर्चा करण्यात आली.

वर्धा मंडल कार्यालयात अधीक्षक अभियंता श्रीमती स्मिता पारखी यांच्या उपस्थितीत औद्योगिक ग्राहकांसोबत तक्रार निवारण बैठक झाली. यावेळी कार्यकारी अभियंता (चाचणी) श्री.योगेंद्र निचत, व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. विकास बांबल यांनी सादरीकरण केले. या बैठकीस कार्यकारी अभियंते सर्वश्री स्वप्नील गोतमारे, हेमंत पावडे, प्रदीप घोरुडे, प्रशांत गायकवाड आदी उपस्थित होते. ■

## दहावीतील गुणवंत



रजत नितिन रघतवान
गुण ८६.५० टक्के
(स्टेट बोर्ड)
पालक : श्री.नितिन रघतवान व श्रीमती दिपाली रघतवान
अति. कार्यकारी अभियंता, सांघिक कार्यालय, / सहाय्यक लेखापाल, कल्याण शहर विभाग.



कु.समृध्दी कैलास लवेकर
गुण ९६.४ टक्के
(सीबीएसई)
पालक : श्री. कैलास लवेकर
कार्यकारी अभियंता, सांघिक कार्यालय,



कु. भार्गवी मिलिंद सासवडकर
गुण ८७ टक्के
(स्टेट बोर्ड)
पालक : श्रीमती मिताली सासवडकर
उपकार्यकारी अभियंता, सांघिक कार्यालय

## छत्रपती संभाजीनगरात वितरण रोहित्रांवरील राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर** येथे महावितरणचे अभियंता व कंत्राटदारांसाठी इंटरनॅशनल कॉपर असोसिएशन इंडिया व इंडियन ट्रान्सफॉर्मर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या वतीने वितरण रोहित्रांच्या संचालन व सुव्यवस्थेतील आदर्श कार्यपद्धती यावर राष्ट्रीय कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेचे उद्घाटन सहव्यवस्थापकीय संचालक श्री.राहुल गुप्ता यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट, आयटीएमएचे अध्यक्ष श्री.मानस कुंडू, सीईएचे संचालक श्री.प्रवीण कमल, आयोजक श्री. कौल यांची



प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक श्री.गुप्ता म्हणाले की, राज्यात महावितरणचे वितरण रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण ३ ते ४ टक्के आहे. हेच प्रमाण मराठवाड्यात ८ टक्के आहे. हे कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत. मुख्य अभियंता श्री.कछोट म्हणाले की, रोहित्र संचालनाच्या आदर्श कार्यपद्धतीचा उपयोग करून वितरण रोहित्रांचे आयुर्मान वाढविता येईल.

सांघिक कार्यालयातील अधीक्षक अभियंता सर्वश्री संदीप देशपांडे, संदीप पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्री. व्यंकटेश पेन्सलवार, श्री. भूपेंद्र गांगुर्डे, हयात खान यांच्यासह क्षेत्रीय अभियंत्यांची उपस्थिती होती. ■

## कोल्हापूर, सांगलीतील पूरस्थिती सजगतेने हाताळली - श्री. खंदारे

**कोल्हापूर व सांगली** जिल्ह्यांत काही दिवसांपूर्वी निर्माण झालेली पूरस्थिती कर्मचाऱ्यांनी योग्य पद्धतीने हाताळली आहे. २४ तास सजग राहत, पुराचा सातत्याने कानोसा घेत, योग्य वेळी वीजपुरवठा बंद केला. यात वीज यंत्रणेमुळे कोठेही अनुचित घटना घडली नाही. तसेच पुरामुळे खंडित झालेला वीजपुरवठा होडीने, पोहत जाऊन प्रसंगी जीव धोक्यात घालून पूर्ववत केला आहे. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील पूरस्थिती अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अत्यंत नियोजनपूर्वक हाताळली असल्याचे दिसून येते, असे मत पुणे प्रादेशिक संचालक श्री.भुजंग खंदारे यांनी व्यक्त केले. कोल्हापूर परिमंडलाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता श्री.स्वप्नील काटकर, अधीक्षक अभियंता श्री.गणपत लटपटे (कोल्हापूर), अधीक्षक अभियंता श्री. धर्मराज पेठकर (सांगली), सहायक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री.विजय गुळदगड, सहायक महाव्यवस्थापक(मानव संसाधन) श्री.शशिकांत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.शिरीष काटकर, सर्व विभागांचे कार्यकारी अभियंते व अधिकारी उपस्थित होते.

श्री.खंदारे पुढे म्हणाले, 'पूर परिस्थितीत केलेल्या कामावरून कर्मचाऱ्यांची ग्राहक सेवेप्रती असलेली बांधिलकी दिसून येते. हीच बांधिलकी नियमित काम करतानाही जपण्याचे निर्देश त्यांनी दिले. दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडताना विविध चालू योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची सूचना त्यांनी दिली. ■

## उल्हासनगर विभागात एक हजार वृक्षांचे रोपण



**शासनाच्या** वन विभागाकडून १ ऑगस्ट ते १५ ऑगस्टदरम्यान 'वृक्षारोपण व संवर्धन कार्यक्रम' हाती घेण्यात आला होता. या कार्यक्रमांतर्गत वन विभागाच्या सहकार्याने कल्याण परिमंडलातील उल्हासनगर -२ विभागाकडून १५ दिवसात एक हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले. स्वातंत्र्यदिनी मुख्य अभियंता श्री.चंद्रमणी मिश्रा यांच्या हस्ते उपक्रमाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. दिलीप भोळे (कल्याण मंडल-२), अधीक्षक अभियंता श्री.दीपक पाटील (कल्याण मंडल-१), कार्यकारी अभियंते सर्वश्री देबाशिष दत्ता, प्रवीण चकोले (उल्हासनगर) उपस्थित होते. वन अधिकारी श्री. व्ही. नातू यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या जनजागृतीसाठी झालेल्या मेळाव्यास मुख्य अभियंता श्री. मिश्रा व आमदार श्री. बालाजी किणीकर यांची उपस्थिती होती. ■

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा : श्री. कुमठेकर



शाश्वत कुंभमध्ये सहभागींशी संवाद साधताना नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर.

**सौर ऊर्जा** निर्मिती प्रकल्पासाठी प्रत्येक कुटूंबास प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून ७८ हजार रुपयापर्यंत अनुदान देण्यात येत आहे. या योजनेचा ग्राहकांनी लाभ घेऊन आपले वीज बिल शून्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांनी केले.

महावितरण व सोलर बीएनआय यांच्या वतीने नाशिक येथे आयोजित शाश्वत कुंभ कार्यक्रमात सौरप्रणाली विक्रेते, ग्राहक यांच्याशी संवाद साधताना ते बोलत होते. याप्रसंगी प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. दत्तात्रय बनसोडे, अधीक्षक अभियंता श्री. ज्ञानदेव पडळकर (नाशिक), अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) श्री. महेंद्र ढोबळे, सोलर बीएनआयचे श्री. मयूर पांडे मंचावर उपस्थित होते. यावेळी सूर्यघर योजनेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या द्वारका, गंगापूर व ओझर या उपविभागाचा सन्मान करण्यात आला. ■

# 'परिवर्तनाचा नायक' पुस्तकाचे प्रकाशन



'परिवर्तनाचा नायक' या पुस्तकाचे प्रकाशन मा. उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पुस्तकाचे लेखक व स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्री. श्रीकर परदेशी, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री.संजीव कुमार यांच्यासह मान्यवर.

**मा. उपमुख्यमंत्री** तथा ऊर्जामंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात झालेल्या परिवर्तनाची माहिती देणाऱ्या 'परिवर्तनाचा नायक' या पुस्तकाचे प्रकाशन मा. उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पुस्तकाचे लेखक व मराविमं सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री.विश्वास पाठक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्री. श्रीकर परदेशी, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री.संजीव कुमार, मराविमं सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री.आशिष चंदाराणा व श्रीमती नीता केळकर उपस्थित होते.

मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या ऊर्जामंत्रिपदाच्या अवघ्या सव्वा दोन वर्षांच्या काळात राज्यामध्ये ऊर्जा क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्यात आल्या. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी ९००० मेगावॅटच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली. हा जगातील सर्वात मोठा डिस्ट्रिब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प आहे. त्यासोबत नवीकरणीय ऊर्जेचा वापर करण्यास चालना देणारी अनेक पावले टाकण्यात आली. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आवश्यक ऊर्जा सज्जता निर्माण करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठीही महत्त्वाचे प्रकल्प राबविण्यात आले. शेतकऱ्यांसह सर्वसामान्य वीजग्राहकांना दिलासा मिळण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले. मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात अत्यंत कमी कालावधीत राज्यात ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन झाले व त्याचा लाभ राज्याला आगामी काळात होत राहणार आहे. याविषयीची माहिती या पुस्तकातून देण्यात आली आहे. ■

Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार • उपसंपादक : श्री. किशोर खोबरे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)